# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ४३-२३** **दिनांक ०६/०२/२०२३**

## नामांकीत कंपनीच्या सायकल चोरी करणा-या सराईत गुन्हेगाराला अटक. आचोळे पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक ०१/०२/२०२३ रोजी रात्रौ ११.३० वा. ते दिनांक ०२/०२/२०२३ रोजी सायंकाळी ०४.०० वा. सुमारास फिर्यादी श्री. रवि रमेशचंद्र पटेल, वय ३५ वर्षे, व्यवसाय नोकरी, रा. रुम नं. सि/३०३, बृदावन गार्डन, डि मार्ट जवळ, वसई - नालासोपारा लिंक रोड, नालासोपारा पु. यांनी ते राहत असलेल्या इमारतीच्या खाली मोकळ्या जागेत उभी करुन ठेवलेली सायकल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी केल्याने आचोळे पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारवरुन दिनांक ०२/०२/२०२३ रोजी आचोळे पोलीस ठाणेत गु.र.नं. ७१/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना दिनांक ०४/०२/२०२३ रोजी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशिर माहिती मिळाली की, वरील गुन्ह्यातील संशयीत आरोपी **भरत चमन वाघरी, वय २१ वर्षे, व्यवसाय कॅटरींग, रा. रु नं. ए/२०३, ओंकार बिल्डींग, शानदार बेकरीजवळ, अलकापुरी, नालासोपारा पश्चिम** हा अलकापुरी, नालासोपारा पुर्व स्टेशन परीसरात फिरत आहे. सदर मिळालेल्या माहितीची शहानिशा करीत असताना संशयीत आरोपी अलकापुरी बाजार पटांगण, मुख्य रोडवरुन चंदन नाका, आचोळे रोड वाजुकडे जात असताना दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याच्याकडे सदर गुन्हयाच्या अनुषंगाने अधिक विचारपूस करता त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक ०४/०२/२०२३ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. त्याच्याकडे सखोल चौकशी करता त्याने चोरी केलेल्या सायकली हया **मो. मोहसीन इनुस मलीक, वय २२ वर्षे, व्यवसाय-सायकल दुकान, रा. रु.नं. ए/२०४, नॅनो बिल्डींग, अलकापुरी, मस्जीद गल्ली, नालासोपारा पुर्व** यास विक्री केल्याचे सांगितल्याने **मो. मोहसीन इनुस मलीक याच्याकडे अधिक विचारपूस करता त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास नमूद गुन्हयात दिनांक ०४/०२/२०२३ रोजी अटक करुन** एकुण ६१,०००/- रुपये किंमतीच्या नामांकीत कंपनीच्या १२ सायकली असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उघडकीस आलेले गुन्हे

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळे पोलीस ठाणे. | गु.र.नं. ७१/२०२२, भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| २. | आचोळे पोलीस ठाणे. | गु.र.नं. ७३/२०२२, भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३, अतिरीक्त कार्यभार परिमंडळ २, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. चंद्रकांत सरोदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सुधिर गवळी पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. यशपाल सुर्यवंशी, पो.उ.नि. सुहास म्हात्रे, स.फौ. राजेश काळपुंड, पो.हवा. दत्तात्रय दाईंगडे, मुस्तकीम पठाण, पोअं. विनायक कचरे यांनी केलेली आहे.

---ooo---